**<u>वादी क्र. १ तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ चा अधिक सरतपास</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**<u>उलट तपास प्रतिवादी क्र. २ ते ७ तर्फे विधिज्ञ श्री. एस.व्ही.धामापुरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१२. मला मोडी लिपी लिहिता व वाचता येत नाही. नि.क्र. १३८/९ वरील मोडी लिपीत असलेला खरेदीखताचा दस्त दाखविण्यात आला. ( वादीचे वकील श्री.गिरकर यांनी सदरचा दस्त दाखविण्यास तसेच निशाणी देण्यास हरकत नोंदविली. श्री गिरकर यांचा असे म्हणणे आहे की, सदर नि.क्र. १३८/९ कडील दस्त ही सहीसुद नक्कल असून प्रतिवादीनी त्याच्यावर दुय्यम पुराव्याची परवानगी घेणे आवश्यक आहे. यावर प्रतिवादींचे वकील श्री. एस.व्ही.धामापुरकर असे म्हणणे आहे की, सदर नक्कल सब रजिष्ट्रार ऑफिस यांचेकडून सहीसुद नक्कल घेतलेली आहे. सदर नक्कलेवर मुळ फोटो खंडावरुन अस्सल व बरहुकूम नक्कल असा शेरा असल्याने तो साक्षीदारास दाखवे शकतो तसेच त्यास निशाणी देण्यास कोणतीही कायदयाची बाधा नाही. मा. बॉम्बे उच्च न्यायालयाच्या परासनबाई जैन वि. सुनंदा जाधव २०१७ (६) ऑल एमआर ८७७ या प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाने असे अभिमत नोंदविलेले आहे की, दुय्यम पुरावा देण्यासाठी अर्जाची गरज नाही आणि तसे परवानगीही नाकारता येत नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाचे अप्पय्या वि. ठंडापान्डी २०२३ एससीसी ऑनलाईन ११८३ यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे अभिमत नोंदविलेले आहे की, *In this context it is to be noted that certified copy issued their under is not a copy of original document, but is a copy of the registration entry which is itself a copy of the original and is a public document under section 74 (2) of the Indian Evidence Act and sub section 5 thereof makes it admissible in evidence for proving the contents of its original.* सबब, मे. उच्च् न्यायालय मुंबई तसेच सर्वोच्च न्यायालय यांचे न्यायनिर्णयाच्या आधारे सदर घेतलेला आक्षेप फेटाळण्यात येत आहे. ) त्यास **<u>नि.क्र.२०५</u>** देण्यात येते.

१३. आता साक्षीदारास नि.क्र. १३८/१० कडील मोडी लिपीत लिहिलेला खरेदीदस्ताच्या भाषातराची प्रत दाखविण्यात आली. ( सदर दस्त दाखविण्यास वादीचेवील श्री.गिरकर यांनीआक्षेप नोंदविला. त्यांचे असे म्हणणे आहे की, साक्षीरास मोडीतीपी लिहिलता व वाचता येत नसल्याने भाषांतर बरोबर केले आहे की चूक हे सांगता येणार नाही. प्रतिवादींचे वकील श्र. एस.व्ही. धामापूरकर यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १३ नियम ७(३) चा आधार घेवून असे म्हणणे मांडले आहे की, जर सदर भाषांतर नसेल तर वादींनी खरे भाषांतर कोर्टात दाखल करण्याची संधी आहे. सदर आक्षेप राखून ठेवून साक्ष्जीदारास सदर दस्त नि.क्र. १३८/१० कडील दाखून प्रश्न विचारण्याची संधी देण्यात येत आहे. तसेच दस्ताला नि.क्र. २०६ देण्यात येत आहे. त्यास **नि.क्र.२०६** देण्यात येते.

१४. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. २०६ वरुन असे दिसून येत नाही की, माझे वडीलांनी सदर खरेदीखतातील मिळकत खरेदी घेण्यासाठी खरेदी घेणार यांना पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा दुरुस्तीसाठी दिलेल्या अर्जावर नि.क्र. १३४ वर माझी एकटीची सही आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते की, कुलमुखत्यार म्हणून माझी सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. १३४ वर कुलमुखत्यार म्हणून सही केली असा मजकूर नाही. हे म्हणणे खरेनाही की, नि.क्र. १३४ वरील अर्ज मला एकटीला देण्याचा कुठलाही अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, स.नं. ३४ हि.क्र. २० हा सामाईक आहे असे आमच्या उलट तपासामध्ये लक्षात आल्यानंतर आम्ही त्याप्रमाणे दावयात दुरुस्ती केलेली आहे. हे म्हणणे खरेनाही की, दि. ०९/०७/१९४५ रोजी झालेले खरेदी हे एकत्र कुटूंबासाठी करण्यात आले होते हे दाखविण्यासाठी माझ्याकडे पुरावा नाही. मी मनी ऑर्डरच्या पावत्या कोर्टत दाखल केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मनी ऑर्डरच्या पावत्यामध्ये सदर रक्कम ही दि. ०९/०७/१९४५ च्या खरेदीखतासाठी पाठविलेल्या आहेत असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.२०६ वरुन असे दिसून येत नाही की, दिनांक ०९/०७/१९४५ चे खरेदीखत हे एकत्र कुटुंबाच्यासाठी करणेत आले होते. हे मला माहित नाही की, सदरचा प्रतिज्ञापत्रामध्ये आधीचा दिलेला प्रतिज्ञापत्राचा मजकूर समाविष्ट आहे. हे म्हणणे खरे आहे

की, दुरुस्त दाव्याचा पूरता सरतपास न देता पूर्ण दाव्याचा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.७० लगत मी दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात दिलेल्या वंशावळीमध्ये काशिराम व पांडुरंग यांना कृष्णाबाई नावाची बहिण होती. ती विवाहित होती. हे म्हणणे खरे आहे की, तिच्या नवऱ्याचे नाव केशव व तिच्या मुलाचे नाव नागेश असे होते. हे म्हणणे खरे आहे की, नागेश हा मयत असून त्यास केशव व उल्हास असे दोन मुलगे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णाबाई किंवा तिच्या वारसांना पक्षकार करण्यास मला कुठलीही अडचण नव्हती.

१५. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत अ.क्र. २ मध्ये प्रतिवादी क्र. २ ने घर बांधले म्हणून मी ग्रामपंचायत वायरी व प्रतिवादी क्र. २ चे वारसांविरुध्द याच न्यायालयात रे.दि.मु.नं. १३९/२०१२ हा दावा दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दावा हा मी ग्रामपंचायतीने प्रतिवादी क्र. २ ने दावा मिळकत अ.क्र. २ मध्ये बांधलेले घर पाडून टाकणेसाठी दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दावा हा मी मागे घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्यामध्ये मला यश मिळणार नाही म्हणून मी दावा मागे घेतला होता. साक्षीदार स्वतःहून सांगते की, घर सामाईक क्षेत्रामध्ये बांधले असल्यामुळे मी दावा मागे घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ ने स.नं. ३४ हि.क्र. २० च्या संपुर्ण क्षेत्रावर बांधकाम केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात मी मागणी केलेले माझे व इतर सहहिस्सेदाराचे हिस्से चुकीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला इतर वादींनी एकत्र हिस्सा घेण्यासाठी कुलमुखत्यारपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ७० वर दाखल असलेले माझे सरतपासाचे शपथपत्र खोटे व खोडसाळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

**<u>प्रतिवादी क्र. १, ८ ते १६</u>** यांना वारंवार पुकारले असता ते गैरहजर सबब, त्यांच्याविरुध्द **<u>उलट तपास नाही</u>** असा आदेश पारीत करण्यात येत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : ३०/०६/२०२५

मोहम्मद कैसर फकीह
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण.